| | | |
|---|---|---|
| 23 | प्रारंभी च्या काळातील स्वातंत्र्य चळवळी आणि महाराष्ट्र ... प्रा.डॉ.वसंत व्यंकटराव कदम | 93 |

Impact Factor-8.575 (SJIF) ISSN-2278-9308

# B.Aadhar

Peer-Reviewed & Refreed Indexed

**Multidisciplinary International Research Journal**

October-2022

(CCCLXXII) 372-A

## Maharashtra's Contribution to the Indian Freedom Struggle



**Chief Editor**
Prof. Virag S. Gawande
Director
Aadhar Social Research & Development Training Institute Amravati

**Executive Editor**
Dr. M.N. Kolpuke
Principal
Maharashtra Mahavidyalaya, Nilanga Dist. Latur

**Editor**
Dr. Subhash G. Benjalwar
Head, Department of History, Maharashtra Mahavidyalaya, Nilanga Dist. Latur

This Journal is indexed in :
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- International Impact Factor Services (IIFS)

For Details Visit To : www.aadharsocial.com

Aadhar Publications

B.Aadhar' Peer-Reviewed & Refereed Indexed Multidisciplinary International Research Journal
Impact Factor -(SJIF) –8.575, Issue NO, (CCCLXXII) 372-A
ISSN : 2278-9308
October, 2022

# प्रारंभी च्या काळातील स्वातंत्र्य चळवळी आणि महाराष्ट्र ...

प्रा.डॉ.वसंत व्यंकटराव कदम
इतिहास विभाग प्रमुख हुतात्मा जयवंतराव पाटील महाविद्यालयातील, हिमायतनगर

एकोणिसाव्या शतकाच्या मध्यापर्यंत ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीने भारतात आपला साम्राज्य विस्तार जवळ जवळ पूर्ण केला असताना, तिसऱ्या मराठा इंग्रज युद्धाने इ.स. 1818 मध्ये महाराष्ट्रातील पेशव्यांची देखील सत्ता संपुष्टात आली आणि आशा रितीने संपूर्ण भारत देश प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीच्या राजकीय गुलामगिरी अडकला गेला. प्रारंभी ईस्ट इंडिया कंपनीचा उदेश केवळ आणि केवळ व्यापार करून आर्थिक लाभ मिळविणे हाच होता, परंतु येथील राजकीय अस्थिरतेचा, दुर्बलतेचा, पर्याप्त परिस्थितीचा, फायदा घेऊन कंपनीच्या अनेक गव्हर्नर जनरल वेगवेगळया नीती व तंत्राचा अवलंब करून भारतीय जनतेच्या राजकीय आणि आर्थिक शोषणाबरोबरच सामाजिक धार्मिक आणि सांस्कृतिक शोषणास सुरूवात केली एवढेच नाही तर भारतीयांच्या सामाजिक व धार्मिक रितिरिवाजातही हस्तक्षेप सुरू केला त्यामुळे भारतीयांच्या मनात ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनी च्या म्हणजेच ब्रिटिश च्या विरोधात मोठा असंतोष निर्माण झाला विशेषतः गोरे लोक म्हणजेच ब्रिटिश हे भारतीय संस्कृतीशी सुरूवाती पासूनच समरस झाले नाहीत, ते भारताच्या भूमीवर परकीय म्हणून आले आणि शेवटपर्यंत परकीय म्हणूनच राहिले, त्यामुळे भारतीय जनतेनेही ब्रिटिश राजवटीला प्रारंभा पासूनच विरोध सुरू केला भारतातच नव्हे तर महाराष्ट्रात ब्रिटिशांना शासक म्हणून बराच काळ मान्यताच दिली गेली नाही .सुरुवातीच्या काळात ब्रिटिश राजवटीला संघटनात्मकरीत्या विरोध करणे शक्य नव्हते कारण जनतेत एकात्मतेचा अभावा होता त्यामुळे प्रारंभी महाराष्ट्रातील रामोशी,भिल्ल, कोळी व गोंड या आदिवासी जाती जमातीच्या लोकांनी ब्रिटिशांच्या विरोधात बंड व उठाव करण्यास प्रारंभ केला प्रस्तुत शोधनिबंधात प्रारंभीच्या काळातील स्वातंत्र्य चळवळ आणि महाराष्ट्र या विषयाची मांडणी केली आहे

रामोशी ही महाराष्ट्रातील आदिवासी जमातीपैकी एक जमात होय या जमातीतील स्वातंत्र्यवीर उमाजी नाईक हे ब्रिटिश राजवटीला विरोध करणारे महाराष्ट्रातीलच नव्हे तर भारत देशातील पहिले स्वातंत्र्यवीर ठरतात 25 डिसेंबर 1827 रोजी कोकणातील कुलाबा जिल्ह्याच्या परिसरात वीर पुरुष उमाजी नाईकांनी जाहीरनामा काढून या भागातील सर्वसामान्य जनता, पाटील, कुलकर्णी व अंमलदारांनी शेतसारा व महसूल इंग्रज सरकारकडे न भरता तो आमच्याकडे भरावा तसेच दुसरा एक जाहीरनामा प्रसिद्ध करून असे जाहीर केले की गोऱ्या इंग्रज लोकांना, अधिकाऱ्यांना पकडून ठार करा आणि जे कोणी या इंग्रज लोकांना,अधिकाऱ्यांना ठार मारतील त्यांना रोख बक्षिसे, वतने व जहागीऱ्या देण्यात येतील. या जाहीर केलेल्या दोन्ही जाहीरनाम्यावरून क्रांतिकारक उमाजी नाईकांचा महाराष्ट्रात प्रतिसरकार निर्माण करण्याचा मानस होता हे स्पष्टपणे दिसून येते, परंतु स्वातंत्र्यवीरउमाजी नाईकांनी सुरू केलेलें कार्य रोखण्यासाठी, त्यांच्या वर्चस्वाला प्रतिबंध घालण्यासाठी, त्यांना पकडण्यासाठी ब्रिटिशांनी मोठें रोख बक्षीस जाहीर केले.

कालखंड कोणताही असो फितूर हे असतातच उमाजी नाईकांच्या अगदी जवळच्या व्यक्तीच्या फितुरीमुळे इ.स 1831 मध्ये उमाजी नाईक इंग्रजांच्या हाती लागले आणि ईस्ट इंडिया कंपनीने त्यांना फासावर लटकावले क्रांतिवीर उमाजी नाईकांचा बंदोबस्त केल्यामुळे महाराष्ट्रातील रामोशांचे बंड थांबतील असे इंग्रजांना वाटत होते परंतु, महाराष्ट्र ही जसी साधू संतांची भूमी आहे तशी ती शूर वीरांची भूमी आहे लागलीच नाईकांच्याच वंशातील दौलतराव नाईक यांनी इंग्रजांच्या विरोधात लढा सुरूच ठेवला. ज्या पद्धतीने सुरूवातीच्या काळात रामोशांनी इंग्रज राजवटीला विरोध केला त्याच पद्धतीने खानदेशातील भिल्लांनी सातपुडा,सातमाळा व अजिंठ्याच्या कुशीत वावरणाऱ्या भिल्लांनीही एकजूट करून हातात तलवारी व बनाट्या घेऊन ब्रिटिशाविरुद्ध लढा सुरू केला त्यावेळी मुंबई प्रांताचे गव्हर्नर एलफिस्टन होते ते संयमी व सौम्य धोरणाचे असल्याने त्यांनी भिल्लांचे आक्रमक धोरण पाहून

B.Aadhar' Peer-Reviewed & Refereed Indexed Multidisciplinary International Research Journal
Impact Factor -(SJIF) –8.575, Issue NO, (CCCLXXII) 372-A
ISSN : 2278-9308 October, 2022

त्यांना शांत करण्यासाठी कंपनीत नोकऱ्या व पेन्शन देऊ केले परंतु इंग्रजांकडून मिळणाऱ्या नौकरी आणि सवलतीला भीक न घालता भिल्लांनी इंग्रजांशी प्रतिकार करणे सुरूच ठेवले.

इ.स.1822 मध्ये खानदेशात इंग्रज राजवटीच्या विरोधात हिरा नावाच्या भिल्लाच्या नेतृत्वाखाली फार मोठा उठाव झाला हा उठाव इतका मोठा होता की खानदेशातील इंग्रजांची संपूर्ण राजवट संपुष्टात आली होती, त्यावेळी मुंबईचे इंग्रज गव्हर्नर एलफिस्टनने कॅप्टन रॉबिन्स यांना खानदेशाच्या प्रशासनाची जबाबदारी देऊन इंग्रज फौजेणीशी पाठविले पुढे त्यांनी सतत दोन वर्ष परिश्रम घेऊन खानदेशातील भिल्लांचा बंदोबस्त केला.

मराठवाड्यात देखील भिल्लांनी निजामशाहीच्या राजवटीला म्हणजेच अप्रत्यक्षरीत्या ईस्ट इंडिया कंपनीच्या राजवटीला विरोधी केला महाराष्ट्रात इंग्रजांनी भिल्लांचे उठाव मोडावेत आणि भिल्लांने पुन्हा उठाव करावे हा पाठ शिवणीचा खेळ भिल्लांनी सुरूच ठेवला होता. भिल्लांचे भागोजी नाईक, नवशा नाईक, काळू बाबा,दौलत नाईक आणि तंट्या भिल्ल इत्यादी बिलांचे प्रमुख पुढारी होते

रामोशी जातीप्रमाणेच महाराष्ट्रात गौंड ही एक आदिवासी जमात असून गौंड जातीच्या प्रमुखाची मदत घेऊन नागपूरचे राजेसाहेब अप्पासाहेब भोसले यांनी इंग्रज राजवटीच्या विरोधात बंड करून नागपूरच्या परिसरात अनेक गावे इंग्रज राजवटीतून मुक्त केली तसेच मराठवाड्यातील नांदेड जिल्ह्यात देखील अप्रत्यक्षपणे इंग्रज राजवटीच्या विरोधात उठाव व बंड झाले. हदगाव तालुक्यातील नाव्हा गावच्या नौसाजी आणि हौसाजी पाटील नाईक या वीरांनी इंग्रजांचा मंडलिक असलेल्या निजामाला जवळजवळ वीस वर्ष दादच दिली नाही इ.स. 1799 ते इ.स.1820 पर्यंत नांदेड जिल्ह्याचा बराचसा भू-भाग त्यांनी आपल्या वर्चस्वाखाली आणला या परिसरात असणारे रामगड कृष्णदुर्ग व नंदगिरी हे किल्ले ही ताब्यात घेतले व निजामशाही चे वर्चस्व झुगारून देऊन निजामास जमीन महसूल देण्याचे नाकारले या नाईकांकडे एक मोठी फौज होती निजामाच्या लष्करांचा तसेच त्यांच्या रोहिले आणि अरबांना अनेक वेळा नाईकाच्या सैन्यांनी पराभूत केले. या संस्थानात निजामाचे वर्चस्व नाकारणे म्हणजे एक प्रकारे इंग्रज सत्तेला विरोध करणे असेच होते नौसाजी आणि हौसाजी पाटील नाईक यांचे बंड मोडणे हैदराबादच्या निजामास अशक्य झाले होते त्यावेळी निजामाने ईस्ट इंडिया कंपनीच्या गव्हर्नरला कळविले की विदर्भाच्या सीमेलगत पैनगंगेच्या खोऱ्यातील नाईकांनी नीजाम व इंग्रज राजवटीला विरोध करून बंड पुकारले आहे त्यामुळे इंग्रजांनी येथील परिस्थिती लक्षात घेऊन हे बंड मोडून काढण्यासाठी इंग्रज अधिकारी मेजर पिट्सन, कॅप्टन इव्हेन्स डेव्हिड, कॅप्टन मेडोज टेलर यांच्या नेतृत्वाखाली तोफा रणगाडे व आधुनिक शस्त्रास्त्रासह इंग्रज फौजेने हौसाजी व नौसाजी नाईक यांच्यावर हल्ले सुरू केले या वीर बंधूंनी जवळपास एक महिना इंग्रज फौजेशी कडवी झुंज दिली परंतु इंग्रजांच्या प्रगत शस्त्रास्त्रापुढे पुढे नाईकांचा निभाव लागला नाही, नाईकांच्या गढीवर तोफांचा मारा सुरू झाला त्यामुळे गढीच्या भिंती ढासाळू लागल्या या लढ्यात नाईकांच्या 480 सैनिकांना विर मरण आले तर कित्येक सैनिक जखमी झाले शेवटी इंग्रज फौजे पुढे नाईकांना हार पत्करावी लागली शेवटी नाईकांची राज्ये इंग्रजांनी फौजेने निजामाच्या स्वाधीन केले.

रामोशी, गौंड , भिल्लांच्या तसेच हटकर नाईकांच्या उठावाबरोबरच महाराष्ट्रात इंग्रज राजवटीला विरोध करण्याचे कार्य कोळयांनीही केले. मराठीशाहीच्या काळात कोळी लोक सैन्यात तसेच गडावरील बंदोबस्तामध्ये त्यांना महत्त्वाचे स्थान होते परंतु, मराठी शाहीच्या अस्तानंतर आणि इंग्रज सत्तेच्या स्थापनेनंतर किल्ल्यांची, गडकोटांची व्यवस्था पूर्णता बदलली त्यामुळे कोळयांच्या हातचे काम गेले आणि त्यांच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न निर्माण झाला. कोळी समाजावर उपासमारीची वेळ आली त्यामुळे महाराष्ट्रातील कोळी जमातीने इंग्रजांच्या विरोधात बंड पुकारले इ.स. 1828 मध्ये रामजी भागडियांच्या अधिपत्याखाली कोळयांनी पहिला उठाव केला यामुळे महाराष्ट्राच्या पश्चिम किनाऱ्यावर इंग्रज आणि कोळी यांच्यामध्ये संघर्षाला सुरुवात झाली हा संघर्ष सतत दोन वर्षे चालू होता शेवटी इंग्रज अधिकारी कॅप्टन अलेक्झांडर यांच्या नेतृत्वाखाली कोळयांच्या विरोधात मोठी मोहीम राबवली व कोळयांचे बंड मोडून काढले त्यामुळे काही काळ कोळी शांत राहिले परंतु त्यांच्या मनात इंग्रज राजवटी विषयी असंतोष मात्र वाढतच राहिला शांततेच्या काळात म्हणजेच वर्ष दीड वर्षाच्या काळात त्यांनी शस्त्रास्त्रांची जमवाजमव करून पुण्यामध्ये इ.स. 1839 मध्ये दुसरा उठाव केला व पुण्याच्या आसपासच्या प्रदेशावर कोळयांचे वर्चस्व असल्याचे घोषित केले हा कोळयांचा उठाव मोडण्यासाठी इंग्रजांची खास फौज बोलावली गेली त्या सैन्यापुढे मात्र कोळयांचा निभाव लागला नाही या उठावाचे नेतृत्व करणाऱ्या आणि यात पुढाकार घेतलेल्या बऱ्याच

कोळयांना फाशीची शिक्षा देण्यात आली तर अनेकांना पकडून तुरुंगात डांबण्यात आले त्यामुळे कोळयांच्या मनातील इंग्रजांविषयीचा द्वेष अधिकच वाढला परत इ.स.1845 ते 1850 च्या दरम्यान कोळयांनी तिसरा उठाव केला, पुण्यातील सरकारी खजिना, कार्यालय सरकारी बंगले लुटणे इंग्रज धारर्जिण्या सावकार व व्यापाऱ्यांना लुटणे, पुणे नाशिक अहमदनगर पुरंदर सातारा नाणेघाट माळशेज तसेच कोकणातील काही भागात अनेक उठाव केले या उठावाचे नेतृत्व चिमणाजी जाधव, रघु भांगडिया बापू भांगडिया, भाऊ खरे व नाना दरबारे इत्यादी क्रांतिवीरांनी केले परंतु, वेगवेगळ्या नीतीचा अवलंब करून महाराष्ट्रातील कोळयांचा उठाव इंग्रजांनी मोडून काढला.

महाराष्ट्रातील आदिवासी, कोळी, रामोशी ,गौंड व हटकर जाती जमातीच्या लोकांचा इंग्रज राजवटीला विरोध सुरू असताना संपूर्ण भारतात इंग्रज सत्तेच्या राजकीय गुलामगिरीतून मुक्त होण्यासाठी 1857 मध्ये राष्ट्रीय उठाव झाला या सशस्त्र क्रांतीचे नेतृत्व मोगल बादशहा बहादूरशाहा आणि काही देशी संस्थानिकांनी केले यामध्ये अनेक स्वातंत्र्यवीर देशभक्त सहभागी झाले होते या उठावात महाराष्ट्र आघाडीवर राहिला यावेळी महाराष्ट्रात अनेक ठिकाणी इंग्रज राजवटीच्या विरोधात सशस्त्र उठाव करण्यात आले नाशिक जिल्ह्यातील पेठ येथील संस्थानिक भगवंतराव कोळी यांनी 1857 च्या स्वातंत्र्यलढ्यात इंग्रजांशी कडवी झुंज दिली या पुर्वी देखील इंग्रजांच्या विरोधात बंड करणाऱ्या स्वातंत्र्यवीरांना त्यांनी सर्वतोपरी मदत केली होती, भगवंतरावाच्या प्रेरणेने त्यांच्या संस्थानातील लोकांनीही इंग्रज लोकांना, अधिकाऱ्यांना त्रास देणे सुरू केले त्यांनी हरसुल शहर व परिसरातील शहरं लुटले इंग्रजांचे वर्चस्व नाकारले या कोळयांच्या उठावाची माहिती मिळताच इंग्रजांची मोठी फौज पेठ मध्ये आली, त्यांनी बंड कर्त्यांची धरपकड सुरू केली, शेवटी 22 डिसेंबर 1857 रोजी पेठ च्या भगवंतरावांचा पराभव झाला. गणपतराव नाईक हे कोळयांचे नेते मारले गेले, भगवंतरावांनी ब्रिटिशांना शरण यावे असे आवाहन केले परंतु या आव्हानास साद न देता पाटील बंधूंनी लढा सुरूच ठेवला परंतु इंग्रजांच्या सैन्यापुढे त्यांचा निभाव लागला नाही शेवटी भगवंतरावावर वेगवेगळे आरोप लावून पेटच्या कचेरीसमोर त्यांना फासावर लटकावण्यात आले.

ईस्ट इंडिया कंपनीने इ.स. 1846 सली सातारचे राजे खालसा केले त्यावेळी सातारचे छत्रपती प्रतापसिंह भोसले यांनी आपले राज्य परत मिळविण्यासाठी आपला वकील रंगो बापूजी गुप्ते यास लंडनला पाठविले तो जवळपास सात वर्ष लंडनमध्ये राहिला त्यांनी सातारच्या छत्रपती ची गादी परत मिळविण्यासाठी इंग्रज दरबारात खूप प्रयत्न केले परंतु, त्यांना यश मिळाले नाही त्यामुळे त्यांनी इंग्रजांच्या विरोधात उठाव करण्याचे ठरविले आणि सातारा, कोल्हापूर ,बेळगाव व धारवाड येथील तरुणांना इंग्रजांच्या विरोधात क्रांतीसाठी तयार केले. यावेळी त्यांनी महाराष्ट्रातील मातंग, रामोशी ,कोळी व भिल्ल यांना एकत्र करून त्यांच्या माध्यमातून सैन्य उभे केले आणि इंग्रजांच्या विरोधात उठाव सुरू केला ही बातमी इंग्रजांना कळताच रंगो बापूजी गुप्ते यांना पकडण्यासाठी मोठे बक्षीस जाहीर केले तेव्हापासून रंगो बापूजी गुप्ते भूमिगत झाले ते शेवटपर्यंत इंग्रजांच्या हाती लागलेच नाहीत. सातारा परिसरातील उठावाबरोबरच रामजी शिरसाट यांच्या नेतृत्वाखाली कोल्हापूर येथे सशस्त्र उठाव करण्यात आला परंतु, इंग्रज फौजे पुढे यांचाही निभाव लागला नाही.

थोडक्यात सारांश रूपाने असे म्हणता येईल की, इंग्रजांच्या राजकीय गुलामगिरीतून मुक्त होण्यासाठी, इंग्रजांचे राजकीय वर्चस्व झुगारून देण्यासाठी भारतीयांनी केलेला पहिला उठाव म्हणजे 1857 चा उठाव व्होय, म्हणजेच भारतीयांचा हा पहिला स्वातंत्र्यसंग्राम होता. या उठावात देखील महाराष्ट्र आघाडीवर राहिला तत्पूर्वी महाराष्ट्रात मराठा सत्तेच्या ऱ्हासानंतर ईस्ट इंडिया कंपनीचे राजकीय वर्चस्व स्थापन झाल्यानंतर महाराष्ट्रातील लोकांनी इंग्रजांचे वर्चस्व सहजासहजी स्वीकारले नाही, जमेल त्या पद्धतीने इंग्रज सत्तेला विरोध केला व आपले स्वातंत्र्य अबाधित राखण्यासाठी पर्यत्नांची पराकाष्टा केली यात महाराष्ट्रातील अनेकांना बलिदान द्यावे लागले कित्येक स्वातंत्र्यवीरांना फासावर चढावे लागले, सुरुवातीच्या काळात महाराष्ट्रात इंग्रज सत्तेला खूप मोठा विरोध झाला इतका अकृमक विरोध भारताच्या इतर भागात झाल्याचे दिसून येत नाही म्हणून स्वतंत्र भारताच्या इतिहासात सुरुवातीच्या काळातील महाराष्ट्रातील स्वातंत्र्य चळवळीला एक ऐतिहासिक महत्त्व प्राप्त होते.

संदर्भ:-

1) प्रा.डॉ.गव्हाणे किशोरकुमार व इतर., आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास, अरुणा प्रकाशन, लातूर, ऑक्टोबर 2014

2) प्रा.डॉ.कठारे अनिल., आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास., विद्या बुक पब्लिशर्स औरंगपुरा औरंगाबाद ., तिसरी आवृत्ती जून 2015.

3) प्रा.भवरे अशोक., आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास., कल्पना प्रकाशन, नांदेड ,2006.

4) डॉ.कठारे अनिल व प्रा.साखरे विजया., आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास., कल्पना प्रकाशन नांदेड, जानेवारी 2008.

5) डॉ. पवार जयसिंगराव व प्रा. पवार सुविधा., आधुनिक भारताचा इतिहास., विद्या प्रकाशन रुईकर पथ महाल नागपूर.

6) डॉ.कठारे अनिल., ब्रिटिश कालीन भारताचा इतिहास., एज्युकेशनल पब्लिशर्स औरंगाबाद 2014.